MHSN050037012022 **नियमित दिवाणी दावा क्र. ५८०/२०२२**
**विरेंद्र वि. श्रीकांत**

**निशाणी क्र. १२ खालील आदेश.**
**(पारीत दिनांक २० /०३/२०२५)**

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती होवून मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

**२.** वादीने असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. ०२ या दिनांक ३१/०८/२०२४ रोजी मयत झालेल्या आहेत. प्रतिवादी क्र. ०२ यांना वादी, प्रतिवादी क्र. १ व ३ व ४ हेच वारस आहेत. त्यामुळे, प्रतिवादी क्र. २ च्या नावासमोर मयत असे नमूद करण्याची परवानगी मिळावी अशी विनंती त्यांनी केलेली आहे.

**३.** प्रतिवादी क्र. १, ३ व ४ विरुध्द प्रकरण एकतर्फा चालविण्यात आलेले आहे.

**४.** युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा जाहिरनाम्यासाठी व मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. ०२ या दावा प्रलंबित असताना मयत झालेल्या आहेत. त्यांचे वारस हे अभिलेखावर सामील आहेत. परत त्यांना वारस म्हणून घेण्याची आवश्यकता नाही. प्रकरणात तांत्रीक अडचण राहू नये म्हणून वादीने केलेली दुरुस्तीची मागणी मंजूर करणे योग्य व न्यायोचित दिसून येते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीला निर्देशीत करण्यात येते की, त्यांनी दाव्यात दुरुस्ती करावी व दुरुस्ती प्रत न्यायालयात दाखल करावी.

MANGESH JAISWAL Digitally signed by MANGESH JAISWAL Date: 2025.03.20 17:20:57 +0530

इस्लामपूर (एम. एन. जयस्वाल)

दिनांक २० /०३/२०२५ दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर

इस्लामपूर, जि. सांगली.